## संक्षिप्त

### प्रा. अलका पाटील यांची उपाध्यक्षपदी नियुक्ती

पुणे, ता. २७ : पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या उपाध्यक्षपदी माजी नगरसेविका प्रा. अलका पाटील यांची नियुक्ती करण्यात आली आहे. नियुक्तीचे पत्र पुणे शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ॲड. अभय छाजेड यांनी दिले आहे. प्रा. पाटील पालिका निवडणुकांपूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसच्या शहर अध्यक्ष होत्या. पालिका निवडणुकांत राष्ट्रवादीतून तिकिट न मिळाल्याने त्यांनी राष्ट्रवादी पक्ष सोडला होता.

### 'बिझनेस इंटेलिजन्स'वर कार्यशाळा आयोजित

पुणे, ता. २७ : सीड इन्फोटेक आणि साम टेक्नॉलॉजी यांच्या वतीने 'बिझनेस इंटेलिजन्स' क्षेत्राबद्दलची अधिक माहिती देण्यासाठी आबासाहेब गरवारे महाविद्यालयाच्या सभागृहात नुकतेच कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी दीपक शिकारपूर, 'साम'चे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश कद्दा,

# कॉस्मेटिक सर्जरीकडे तरुणांचा वाढता कल

सकाळ वृत्तसेवा

पुणे, ता. २७ : आपण दिसायला सुंदर असावे, असे प्रत्येकालाच वाटते. पण नेमके नाक मोठे, गालावर नाजूक अशी खळी का नाही, तर काहींना चेहऱ्यावरच्या सुरकुत्यांची काळजी; काही जण वजन कमी करण्यासाठी वाट्टेल ते प्रयोग करायलाही तयार असतात. प्रत्येक व्यक्ती सुंदर होण्याचे स्वप्न बघते. पण आता हे स्वप्न राहिलेले नाही; कारण त्यांना पर्याय मिळाला आहे, कॉस्मेटिक सर्जरीचा!

चित्रपटांमधील कलाकार आकर्षक दिसण्यासाठी चेहऱ्यावर तसेच अवयवांवर शस्त्रक्रिया करून घेतात, हे आपण नुसते ऐकत असतो. पण अलीकडे कॉल सेंटर, आयटी कंपन्या, मॅनेजमेंट कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या तरुण, तरुणींचे सर्जरी करून घेण्याचे प्रमाण वाढते आहे.

वैद्यकीय क्षेत्रातील प्रगतीमुळे कॉस्मेटिक सर्जरी हा प्रकार आता काही हजारांमध्ये उपलब्ध झाला आहे. एवढेच नाही तर परदेशातील अनेक मंडळींना रुपया स्वस्त वाटत असल्याने या शस्त्रक्रियेसाठी ते पुण्या-मुंबईत येत आहेत.

या संदर्भात माहिती देताना प्रसिद्ध प्लॅस्टिक सर्जरी तज्ज्ञ डॉ. पराग सहस्रबुद्धे म्हणाले, "आपल्या व्यक्तिमत्त्वाबद्दल तरुण जागरूक झाले असून त्यांना छान दिसणे, ही काळाची गरज वाटते. लहान वयात मिळणाऱ्या गलेलठ्ठ पगारामुळे ही शस्त्रक्रिया करणे त्यांना सहज शक्य होते.

उपचारांसाठी येणाऱ्यांमध्ये विशीपासून ते अगदी पन्नाशीच्या वयातील व्यक्तींचा समावेश असतो. विशेष म्हणजे यामध्ये महिलांचेच प्रमाण जास्त असते असे नाही, तर मुलींच्या बरोबरीने मुलेही ही शस्त्रक्रिया करून घेतात.

साधारणतः वाकडे नाक सरळ करण्यासाठी (नोज इम्प्लांट), टक्कल आणि (हेअर ट्रान्स्प्लाट) त्यावरील उपायांसाठी, ओठांचा आकार लहान करण्यासाठी (नॉन सर्जिकल फेशियल रेज्युनिव्हेशन), कर्करोगामुळे जर स्तनाची शस्त्रक्रिया झाली असेल तर ते पूर्ववत करणे, चरबी वाढली असेल तर ती कमी करणे, चेहऱ्यावरचे व्रण घालविणे आदींसाठी ही उपचार पद्धती वापरली जाते. याहून वेगळे म्हणजे, खळी पाडून हवी आहे, (चिक इम्प्लांट), चेहऱ्यावरच्या सुरकुत्या कमी करायच्या आहेत (फेस लिफ्ट), स्तनाचा आकार वाढविण्यासाठी (ब्रेस्ट एग्युमेंटेशन), गुडघ्यांपासून तळपायांपर्यंतचा भाग आकर्षक दिसण्यासाठी (काल्फ इम्प्लांट), तसेच पोट कमी करण्यासाठी जास्त व्यक्ती येतात."

### काय काळजी घ्याल?

कित्येकदा चेहऱ्यावरील डाग घालवून देतो, वजन कमी करून देतो, असे सांगून अभ्यास नसलेल्या अनेक व्यक्ती लोकांवर उपचार करतात. त्याचे शरीरावर वाईट परिणाम होण्याची शक्यता असते. त्यामुळे कोणतीही कॉस्मेटिक सर्जरी करण्यापूर्वी त्या डॉक्टरांचा या विषयात अभ्यास आहे का, याची खात्री करा. आपल्याला नक्की कोणत्या अवयवात कसा बदल करून हवा आहे, तो आपल्या शरीराला योग्य दिसेल का, याचा विचार करूनच शस्त्रक्रिया करा.



### सध्याची मागणी?

- चेहऱ्यावरील सुरकुत्या, डाग कमी करणे
- खळी पडायला हवी
- ओठांचा आकार बदलणे
- नाकांचा आकार बदलणे
- व्यायामाने नको, शस्त्रक्रियेने चरबी काढा